


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे ।अंक २२१। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) ।संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० ।कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | शुक्रवार ११ /०९/२०२६ । पाने - ६




# लोकशाही धोक्यात येणे ही चिंतेची बाब - प्रा. डॉ. बाविस्कर

## अस्वस्थ भारताच्या अंतरंगाचा नव्या पिढीने वेध घ्यावा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - इतर कोणत्याही सत्ता पद्धतीमध्ये स्वातंत्र्याला स्थान नसते; स्वातंत्र्याची खरी अनुभूती केवळ लोकशाही व्यवस्थेतच शक्य आहे. विस्कटलेला समाज आणि राज्यसंस्था यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणजे लोकशाही होय. भारतीय समाजमनाचे आरोग्य सुदृढ राहावे, यासाठी घटनाकारांनी निर्माण केलेली ही व्यवस्था आज धोक्यात आली आहे की काय, अशी भीती निर्माण करणारी परिस्थिती देशात दिसत आहे, असे प्रतिपादन दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक व ज्येष्ठ लेखक प्रा. डॉ. शरद बाविस्कर यांनी केले.

महात्मा फुले यांच्या जन्मद्विशताब्दी निमित्त संगमनेर येथील सत्यशोधक विचार मंचाच्या वतीने 'अस्वस्थ भारताचे अंतरंग' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. बाविस्कर मुख्य वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे होते. छात्र भारतीचे राज्याध्यक्ष अनिकेत घुले, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. बाविस्कर म्हणाले की, लोकशाहीला पूरक ठरणारे उपाय आणि सामाजिक जाणीव जितकी वाढेल, तितके भारतीय समाजमन अधिक सुदृढ होईल. मात्र, देश आजारी असतानाही तो आजारी नाही, असा आभास निर्माण करणे अधिक धोकादायक आहे. सध्याच्या अस्वस्थ वातावरणात नव्या पिढीने आशेचा नवा श्वास निर्माण करण्याचे काम केले आहे. आपल्याला जी परिस्थिती अस्वस्थ करणारी वाटते, तीच काहींसाठी 'अमृतकाळ' असू शकते. अशा प्रकारचे वैचारिक मतभेद महात्मा फुले यांच्या काळातही होते, असे त्यांनी स्पष्ट केले. (पान २ वर)

# मराठा आरक्षणा संबंधी योग्य निर्णय करू - बावनकुळे

## मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत कुणबी प्रमाणपत्रांसाठी कॅम्प सुरू

मुंबई (वृत्तसंस्था)

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांचे उपोषण आज १३ व्या दिवशीही सुरू आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महसूलमंत्री चंद्रशेखर यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. मराठा आरक्षणासंदर्भात सरकारने अनेक मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतले असून, संवादाच्या माध्यमातून या प्रश्नावर तोडगा निघू शकतो, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत पात्र व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी कॅम्प सुरू करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया केवळ जरांगे यांच्या आंदोलनानंतर सुरू झालेली नाही. मराठा-कुणबी तसेच कुणबी-मराठा नोंदींच्या आधारे पात्र व्यक्तींना यापूर्वीही नियमांनुसार प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत, असा दावा मंत्री बावनकुळे यांनी केला. जात प्रमाणपत्र देताना निश्चित करण्यात आलेली नियमावली आणि एसओपीनुसारच प्रक्रिया राबविली जात आहे. संबंधित व्यक्तीची कागदपत्रे आणि नोंदींची पडताळणी केल्यानंतरच प्रमाणपत्र दिले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी विशेष कॅम्प सुरू करण्यात आले आहेत. पात्र मराठा समाजातील व्यक्तींना उपलब्ध नोंदी व निर्धारित निकषांच्या आधारे प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया या कॅम्पमधून राबविली जात आहे.



ओबीसी महासंघाने या निर्णयाचे स्वागत केले असले तरी कुणबी प्रमाणपत्रांची वैधता कायम राहावी, अशी भूमिका मांडली आहे. यावर सरकारची भूमिका स्पष्ट असून, नियम व निकषांनुसारच प्रमाणपत्रे दिली जात असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. दरम्यान, राज्यातील सुमारे ५८ लाख जुन्या नोंदी आणि जरांगे यांच्या आंदोलनानंतर आढळलेल्या ४९ नोंदींची छाननी करण्याची मागणी राष्ट्रीय ओबीसी महासंघाने केली आहे. काही नोंदींमध्ये नावे किंवा आकडेवारीची पुनरावृत्ती असल्याचा दावा करीत या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या मागणीबाबत अद्याप अधिकृत स्वरूपात कोणतीही मागणी सरकारकडे आलेली नसल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. माध्यमांमधून ही मागणी करण्यात आली असेल; मात्र अधिकृत मागणी प्राप्त झाल्यास ती ओबीसी उपसमितीसमोर ठेवून त्यावर चर्चा केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान राज्यातील काही भागांत पावसाने ओढ दिल्याने पिकांवर संकट निर्माण झाले आहे. अनेक ठिकाणी पिके करपण्याची परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्य सचिव आणि प्रशासनाला नुकसानग्रस्त भागांचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली. महसूल, कृषी आणि ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून संयुक्तपणे हे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर नियमानुसार एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या निकषांनुसार शेतकऱ्यांना किती मदत देता येईल, हे निश्चित केले जाईल. त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यात येईल, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

# गणेश विसर्जनासाठी प्रवरा नदीत पाण्याचे आवर्तन सोडा

## आ. सत्यजित तांबे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे आग्रही मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सध्या गणेश उत्सवाचे वातावरण असून राज्यासह देशात श्री गणेशाचे स्वागत भक्तिमय व आनंदमय वातावरणात होणार आहे. संगमनेर शहरातही हा गणेश उत्सव मोठ्या आनंदात साजरा होत असून गणेश मूर्ती विधिवत विसर्जनासाठी प्रवरा नदीपात्रात आवश्यक पाण्याचे आवर्तन तातडीने सोडावे अशी आग्रही मागणी आमदार सत्यजित तांबे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.



जिल्हाधिकारी यांना दिलेल्या पत्रात आमदार सत्यजित तांबे यांनी म्हटले आहे की, संगमनेर शहर व तालुक्यात गणेश उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होतो. गणेश मूर्तींची विधिवत विसर्जन करण्यासाठी प्रवरा नदीपात्रात पुरेसे पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे. अन्यथा गणेश मूर्तींची हेळसांड होते. गणेश उत्सव हा नागरिकांच्या धार्मिक व भावनिक सध्याची जोडला गेलेला मोठा उत्सव असून गणेश मूर्तींची विधिवत विसर्जन हा या उत्सवातील अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे गणेश मूर्ती विसर्जन करीत असताना नदीपात्रात पुरेसे पाणी असणे आवश्यक आहे. यापूर्वी प्रवारा नदीपात्रात पाणी उपलब्ध नसल्याने संगमनेर शहरातील गणेश मूर्तींचे विसर्जन लांबणीवर पडल्याच्या घटना घडलेल्या आहेत. सन २०१२ मध्ये तर पाणी नसल्यामुळे गणेश विसर्जन तब्बल १५ दिवस पुढे ढकलण्यात आले होते. यावर्षीही अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये आणि गणेश विसर्जनाच्या दिवशीच संगमनेर शहर व तालुक्यातील गणेश मूर्तींचे विधिवत विसर्जन करता यावे यासाठी प्रवरा नदी पात्रात पाणी असणे गरजेचे आहे.

### नगरपालिकेकडून पाणी सोडण्याची मागणी

**गणेशभक्तांच्या भावनेचा विचार करून गणेशमूर्ती विसर्जनासाठी प्रवरा नदीपात्रात तातडीने पुरेसे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी आग्रही मागणी नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तसेच कार्यकारी अभियंता, अहिल्यानगर पाटबंधारे विभाग यांना पत्र देऊन आवश्यक पाण्याचे आवर्तन वेळेत सोडण्याची मागणी केली आहे. सन २०१२ मध्ये पाणी उपलब्ध नसल्याने गणेश विसर्जन तब्बल १५ दिवस पुढे ढकलावे लागले होते. यंदा अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये अशी भूमिका नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांनी मांडली.**

# पेट्रोल भरले, फोन-पे केल्याचे भासवले आणि कार घेऊन पसार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील घारगाव येथे पेट्रोल पंपावर दोन हजार रुपयांचे पेट्रोल भरून घेतल्यानंतर फोन-पेच्या माध्यमातून पैसे अदा केल्याचे भासवून एका कारचालकाने कारसह पोबारा केल्याची घटना मंगळवारी (दि. ८ सप्टेंबर) सकाळी घडली. विशेष म्हणजे, पैसे खात्यात जमा झाले नसल्याचे लक्षात येताच पेट्रोल पंपावरील कर्मचारी व व्यवस्थापकांनी दुचाकीवरून संबंधित कारचा सिनेस्टाईल पाठलाग केला. मात्र, कारचालकाने भरधाव वेगाने कार पळवत त्यांना हुलकावणी देत पलायन केले.

घारगाव बसस्थानक परिसरात साई बालाजी पेट्रोलियम हा पेट्रोल पंप आहे. मंगळवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास लाल रंगाची एक कार पेट्रोल पंपावर आली. कारचालकाने आपल्या वाहनात तब्बल दोन हजार रुपयांचे पेट्रोल भरून घेतले. पेट्रोल भरल्यानंतर त्याने पंपावरील कर्मचारी




सार्थक केदार यांच्याकडे ऑनलाइन पेमेंट करण्यासाठी स्कॅनर मागितला. यानंतर कारचालकाने मोबाईलवरून फोन-पेच्या माध्यमातून पैसे पाठवल्याचे भासवले आणि कोणतीही रक्कम दिली नसताना कार घेऊन तेथून निघून गेला. सुरुवातीला पेमेंट झाल्याचे कर्मचाऱ्यांना वाटले. मात्र, काही वेळाने संबंधित दोन हजार रुपयांची रक्कम खात्यात जमा झाली नसल्याचे सार्थक केदार यांच्या निदर्शनास आले. (पान -२ वर)












# कान्होबा देवस्थानच्या जागेवर अखेर नामफलक

## आ. अमोल खताळ यांच्या हस्ते पूजा आरती



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -घुलेवाडी ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री कान्होबा देवस्थानच्या जागेवरील हक्काचा बहुप्रतीक्षित निकाल देवस्थानच्या बाजूने लागल्याने घुलेवाडी ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. संगमनेरच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी देवस्थानच्या बाजूने निर्णय दिल्यानंतर या जागेवर श्री कान्होबा देवाच्या नावाने नामफलक लावण्यात आला. या नाम फलकाचे अनावरण आमदारा अमोल खताळ यांच्या हस्ते करून विधिवत पूजा-अर्चा करण्यात आली.

श्री कान्होबा देवस्थानच्या जागे वरील हक्क प्रस्थापित करण्यासाठी घुलेवाडी ग्रामस्थ गेल्या अनेक वर्षां पासून कायदेशीर मार्गाने लढा देत होते.ग्रामस्थांच्या या न्याय्य हक्काच्या मागणीसाठी आमदार अमोल खताळ यांनीही विधानसभेत आवाज उठवत हा प्रश्न शासनाच्या निदर्शनास आणून दिला होता. सातत्यपूर्ण पाठपुराव्या नंतर उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयामुळे ग्रामस्थांच्या लढ्याला यश मिळाले आहे. निकाला नंतर य जागेवर घुलेवाडी ग्रामस्थांच्या उपस्थितीमध्ये श्री कान्होबा देवाच्या नावाचा नामफलक लावण्यात आला. त्यानंतर विधिवत पूजा करण्यात आली.या संपूर्ण लढ्यात सातत्याने प्रयत्न करणाऱ्या सर्वच हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांचे, व घुलेवाडी ग्रामस्थांचे तसेच संपूर्ण प्रकरणात शांतताआणि सुव्यवस्था कायम राखण्यासाठी सहकार्य करणाऱ्या पोलीस प्रशासन यांचे घुलेवाडी ग्रामस्थांनी आभार मानले.

श्री कान्होबा देवस्थान ही घुलेवाडी ग्रामस्थांच्या श्रद्धेची आणि आस्थेची जागा आहे. या जागेवरील हक्का साठी ग्रामस्थांनी अनेक वर्षे संयमाने आणि कायदेशीर मार्गाने लढा दिला. हा उतारा श्री कान्होबा देवस्थान च्या नावाचा आहे त्यामुळे याच्यावर कोणीही अधिकार गाजवणे किंवा हस्तक्षेप करणे चुकीचे आहे. या जागेत जे पीक आहे त्याची पीक नोंदणी कान्होबा देवस्थानच्या नावाने झाली पाहिजे त्यामुळे या जागेवर अधिकार कान्होबा देवस्थान आणि घुलेवाडी ग्रामस्थांचा आहे याच्यात कोणीही विनाकारण चुकीचे गैरसमज पसरू नये आणि कुठल्याही प्रकारे कायदा सुवस्थेला काळभोर लागेल असा प्रकार करू नये असे आ. अमोल खताळ यांनी सांगितले.

## पान १ वरून - लोकशाही धोक्यात येणे ही...

सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना त्यांनी विविध बाबा-बुवांच्या माध्यमातून लोकांच्या मनात भ्रामक विचार बिंबविले जात असल्याची टीका केली. 'सत्ता हाच एकमेव धर्म मानणारे राजकारणी प्रत्यक्षात सर्वाधिक नास्तिक असतात,' असा टोलाही त्यांनी लगावला.

महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणांच्या चळवळीचा संदर्भ देताना डॉ. बाविस्कर यांनी सांगितले की, १९व्या शतकात महाराष्ट्राप्रमाणेच पश्चिम बंगालमध्येही सुधारणावादी चळवळीला सुरुवात झाली होती. मात्र, महाराष्ट्रातील ही चळवळ तळागाळातील समाजापर्यंत पोहोचली; बंगालमध्ये तसा व्यापक सामाजिक विस्तार झाला नाही. त्यामुळे आज पश्चिम बंगालमध्ये अशा स्वरूपाचे मुक्त वैचारिक व्याख्यान देणे अवघड झाले आहे. महाराष्ट्रात मात्र नागरी समाज आणि समाजमन अजूनही जागृत व जिवंत असल्यामुळे वैचारिक संवादाची परंपरा टिकून आहे. बिहार, उत्तर प्रदेश आणि अन्य राज्यांमधील सामाजिक परिस्थिती यापेक्षा वेगळी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. सुधीर तांबे यांनीही देशातील सद्यस्थितीबाबत चिंता व्यक्त केली. भारताकडे प्रचंड बौद्धिक क्षमता असतानाही जगाच्या पटलावर आपण नेमके कुठे आहोत, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. समाजात जाणीवपूर्वक मतभेद पेरून माणसा-माणसांत भेद निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असे ते म्हणाले.

जगभरात, अगदी अमेरिकेसारख्या प्रगत देशातही माणसाचे 'जनावरीकरण' करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगत डॉ. तांबे म्हणाले की, तेथील लोकशाही व्यवस्था या संकटाचा सामना करण्यास सक्षम आहे. मात्र, भारतात लोकशाहीचे मुख्य स्तंभच कमकुवत होत असल्याचे गंभीर चित्र निर्माण झाले आहे. या परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी नागरिकांनी संघटित होऊन लोकशाही मूल्यांचे संरक्षण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

## पान १ वरून - पेट्रोल भरले, फोन-पे केल्याचे...

ही बाब त्यांनी तातडीने पेट्रोल पंपाच्या व्यवस्थापक प्रिया कारंडे यांच्या निदर्शनास आणून दिली. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच दोघांनीही वेळ न दवडता दुचाकीवरून लाल रंगाच्या कारचा पाठलाग सुरू केला. आपला पाठलाग होत असल्याचे कारचालकाच्या लक्षात येताच त्याने कारचा वेग वाढवला. भरधाव वेगाने कार पळवत त्याने पाठलाग करणाऱ्या दुचाकीला दोन वेळा हुलकावणी दिली. तसेच कार अंगावर घालण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही व्यवस्थापक प्रिया कारंडे यांनी केला आहे. अखेर कारचालक वेगाने कार घेऊन पसार होण्यात यशस्वी झाला.

या घटनेमुळे पेट्रोल पंप व्यावसायिकांमध्ये ऑनलाइन व्यवहारांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मोबाईलवरील पेमेंटचा स्क्रीनशॉट किंवा व्यवहार झाल्याचे दाखवणाऱ्या स्क्रीनवर विश्वास न ठेवता संबंधित रक्कम प्रत्यक्ष बँक खात्यात जमा झाली आहे की नाही, याची खात्री केल्यानंतरच वाहनचालकाला रवाना करणे आवश्यक आहे. दरम्यान, या घटनेची घारगाव पोलिसांनी गांभीर्याने दखल घेऊन पेट्रोल पंपावरील सीसीटीव्ही फुटेज तसेच उपलब्ध तांत्रिक माहितीच्या आधारे संबंधित कारचालकाचा शोध घ्यावा आणि त्याच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील व्यापारी व नागरिकांकडून करण्यात येत आहे. ऑनलाइन व्यवहारांच्या नावाखाली होणाऱ्या अशा फसवणुकीच्या प्रकारांना वेळीच आळा घालण्याची गरज व्यक्त होत आहे.

# वीज कंपन्यांचे खासगीकरण नाही

## कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रातील महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या राज्य शासनाच्या मालकीच्या वीज कंपन्यांचे कोणत्याही परिस्थितीत खासगीकरण केले जाणार नाही, अशी स्पष्ट ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. वीज कंपन्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून नफ्यात आणणे, तसेच त्यांच्या पायाभूत सुविधा अधिक मजबूत करणे, हे शासनाचे धोरण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या निर्णयामुळे राज्यातील हजारो वीज कर्मचारी, अभियंते आणि अधिकाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे वीज कर्मचारी, अभियंते व अधिकारी कृती समितीसोबत झालेल्या बैठकीत वीज क्षेत्राशी संबंधित खासगीकरण, पेन्शन, बोनस, कंत्राटी कामगार, कंपनीची पुनर्रचना, पदोन्नती आदी १८ प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, तिन्ही वीज कंपन्यांचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे महामंत्री अरुण पिवळ, अध्यक्ष विठ्ठल भालेराव यांच्यासह १८ कामगार संघटनांचे पदाधिकारी बैठकीला उपस्थित होते.

मागील दिवाळीत रोखण्यात आलेला वीज कर्मचाऱ्यांचा बोनस तातडीने देण्याचे स्पष्ट आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी वीज कंपन्यांच्या व्यवस्थापनाला दिले. तसेच महावितरणच्या पुनर्रचनेविरोधात झालेल्या संपानंतर कर्मचाऱ्यांवर करण्यात आलेल्या न्यायालयीन कारवाया, परिपत्रक क्रमांक ५५५५ अंतर्गत करण्यात आलेली कारवाई आणि वेतनकपात रद्द करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. संपादरम्यानचे दोन दिवस रजा म्हणून ग्राह्य धरून त्यांचा पगार देण्याचेही आदेश देण्यात आले.

### ८० हजार कोटींच्या कर्जाबाबत मोठा निर्णय

महावितरणवरील सुमारे ८० हजार कोटी रुपयांच्या कर्जाची जबाबदारी राज्य शासन टप्प्याटप्प्याने स्वीकारणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. तसेच महावितरणच्या १० टक्के शेअर्सच्या लिस्टिंगद्वारे भांडवल उभारण्याचा प्रस्ताव असल्याची माहिती देण्यात आली.

कंत्राटी कामगारांना हरियाणा पॅटर्ननुसार स्थायी रोजगार देण्याच्या मागणीवर एका महिन्यात अभ्यास करून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना सहाय्यक पदाऐवजी सरळ भरती प्रक्रियेद्वारे स्थायी पदावर सामावून घेण्याबाबतही त्यांनी सकारात्मक निर्देश दिले. दरम्यान, महावितरणच्या कार्यक्षेत्रात खासगी कंपन्यांना समांतर वीज वितरणाचा परवाना दिला जाणार नाही, अशी ठाम भूमिका मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केली. वाढत्या विजेच्या मागणीचा विचार करून चंद्रपूर येथे ८०० मेगावॅट क्षमतेचा औष्णिक वीज प्रकल्प उभारण्यासह राज्यातील पारेषण व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उपाययोजनांना शासन प्राधान्य देणार आहे.

## भारताची नेपाळसाठी ३५ टन मदत सामग्री

नवी दिल्ली - नेपाळमध्ये आलेल्या भीषण पूरानंतर भारताने ३५ टन मदत आणि बचाव सामग्रीची ८ वी खेप पाठवली. भारतीय वायुसेनेचे विमान बुधवारी काठमांडूला पोहोचले. यामुळे भारताने आतापर्यंत १३० टनांहून अधिक मदत सामग्री पाठवली आहे. या खेपमध्ये तंबू, ब्लँकेट, स्वच्छता किट, सौर दिवे, औषधे आणि बचाव उपकरणे यांचा समावेश आहे. भारताने २६ ऑगस्ट रोजी मदत अभियान सुरू केले होते. नेपाळ पोलिसांच्या माहितीनुसार, पूरग्रस्त भागातून आतापर्यंत १३६७ मृतदेह सापडले आहेत. १०२ मृतदेहांची ओळख पटली आहे.

# आईप्रती निष्ठा आणि समर्पण हे युवकांसाठी प्रेरणादायी - माजी मंत्री थोरात

## १२ ज्योतिर्लिंग व ४ धामांची यात्रा धावत पूर्ण करण्याचा मोनू बेतोराचा संकल्प



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- भारतीय संस्कृतीमध्ये आई - वडिलांना परमेश्वराचे स्थान आहे. आई - वडिलांची सेवा ईश्वर सेवा मानून आईच्या आदर्श विचारांचा वारसा जपत बिहार पाटणा येथील मोनू बेतोरा यांनी पायी धावत देशातील १२ ज्योतिर्लिंग व ४ धामांची यात्रा पूर्ण करण्याचा संकल्प केला असून ७२०० किलोमीटरचा प्रवास करणाऱ्या मोनू बेतोरा यांचे काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी सत्कार केला असून मोनूचे आईप्रती असलेले समर्पण हे युवकांसाठी प्रेरणादायी असल्याचे गौरवोजगार त्यांनी काढले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर बिहारमधील पाटणा जिल्ह्यातील मोनू बेतोरा यांचे स्वागत मा.महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले यावेळी समवेत युवक काँग्रेसच्या अध्यक्ष डॉ.जयश्रीताई थोरात, उद्योजक बाळासाहेब देशमाने, योगेश देशमुख, हर्षल काकड यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना माजीमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, बिहार राज्यातील मोनू बेतोरा यांनी आई - वडिलांचा संस्कारांचा वारसा होऊन देशातील बारा ज्योतिर्लिंग आणि चार धामांची यात्रा धावत पूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. भारत हा विविध संस्कृती भाषा प्रांत यांनी बनलेला असून २२ वर्षीय मोनूचा हा धावत होणारा प्रवास देशाच्या एकात्मतेचा संदेश देणार आहे. बिहार, झारखंड, तेलंगणा, तामिळनाडू, केरळ, कर्नाटक असा प्रवास करून तो महाराष्ट्रात आला आहे. महाराष्ट्रातील भीमाशंकर,त्र्यंबकेश्वर,घृष्णेश्वर याचबरोबर विविध शंकरांच्या मंदिरांचे तो दर्शन घेत आहे. अध्यात्म आणि संस्कृती याचबरोबर देशाच्या एकात्मतेचा विचार तो तरुणांना देत आहे.दररोजचा त्याचा प्रवास हा निष्ठा प्रेम समर्पण दर्शविणारा असल्याचे ते म्हणाले.

तर डॉ.जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, आई - वडिलांच्या संस्कारातून देशभरातील बारा ज्योतिर्लिंगाचे दर्शन धावत घेण्याचा हा अभिनव उपक्रम नक्कीच अभिमानास्पद आहे. देशामध्ये नेहमीच अतिथींचे स्वागत होत असून विविध गावांमधून त्याचे नागरिक जोरदार स्वागत करत आहे.तरुणांमध्ये त्याच्याप्रती मोठी अस्था आहे. महाराष्ट्रातून आणि संगमनेर तालुक्यातून विविध ठिकाणी मोनू ने केलेल्या प्रवास हा तरुणांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

तर मोनू बेतोरा म्हणाले की, महाराष्ट्र मध्ये माझे आहोत पूर्व स्वागत झाले. संगमनेर मध्ये आल्यानंतर मला घरी आल्यासारखे वाटले. डॉ.जयश्रीताई थोरात यांनी अत्यंत काळजी घेतली तर महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांना भेटण्याची मोठी इच्छा होती. कोल्हापूरमध्ये आल्यानंतर संगमनेर मार्गे जाणार म्हटल्यानंतर त्यांना भेटावे असे मनात होते आणि योगायोगाने त्यांची भेट झाली हा माझ्यासाठी सुवर्णक्षण आहे. इतके मोठे नेते असूनही साधेपणा हे त्यांचे वैशिष्ट्ये माझ्यासाठी कायम प्रेरणादायी आणि आशीर्वादाचे ठरणार असल्याचे ते म्हणाले.

# विद्युत मोटार केबल चोरांची टोळी गजाआड

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- तालुक्यातील कोतूळ व पिंपळगाव खांड परिसरातील मुळा नदीपात्रात शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारींच्या केबल चोरी करणाऱ्या टोळीचा अकोले पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी आठ आरोपींना अटक करून सुमारे २ लाख ४१ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

कोतूळ येथील शेतकरी दीपक गंगाधर देशमुख यांनी १७ ऑगस्ट रोजी अकोले पो-लीस ठाण्यात फिर्याद दिली होती. कोतूळ शिवारातील पळसुंदे येथील मुळा नदीपात्रा-तून स्वतः सह इतर शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारींच्या केबल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे त्यांनी फिर्यादीत म्हटले होते. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार करण रामभाऊ मधे (२१, रा. पांगरी, ता. अकोले), किरण संतोष मधे (२४, रा. धांदरफळ बुद्रुक, ता. संगमनेर), साहिल बुधा गिहे (२२, रा. एकलव्य नगर, नांदूर शिंगोटे, ता. सिन्नर) आणि अविनाश कैलास मधे (२२, रा. एकलव्य नगर, नांदूरशिंगोटे, ता. सिन्नर) यांना पोलिसांनी ताब्यात घेत ले. चौकशीत त्यांनी चोरीची - कबुली दिली. चोरी केलेल्या केबलमधील तांब्याच्या तारा काढून त्या राजेंद्र सोमनाथ वर्षे (३१, रा. वरवंडी, ता. ये संगमनेर) याला दिल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर वर्षे याची चौकशी मि केली असता त्याने तांब्याच्या तारा गुलाम रसूल इसाक शहा (४३, रा. आश्वी, ता. संगमनेर) याला विकल्याचे कबूल केले. पुढील तपासात शहा याने हा मुद्देमाल अब्बास सुभान तांबोळी (६६, रा. चितळी रोड, राहाता) आणि प्रशांत रामदास डमाळे (४३, रा. लोणी, ता. राहाता) यांना विकल्याचे सांगितले. या कारवाईत पोलिसांनी १० हजार रुपये किमतीचा मोबाईल, १ लाख ५० हजार रुपये किमतीची कार (एमएच ४३, एक्स ६५०७) तसेच चोरीच्या केबलमधील सुमारे २६ किलो व ४६ किलो वजनाच्या तांब्याच्या तारा असा एकूण २ लाख ४१ हजार २००

# पुढील पाच वर्षांत महसूल विभागाचा चेहरा मोहरा बदलेल- शैलेश हिंगे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -प्रांताधिकारी अरुण उंडे व तहसीलदार धीरज मांजरे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुक्यात महसूल विभागाने रस्ते अतिक्रमणाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी केलेले काम कौतुकास्पद आहे. अतिक्रमणामुळे बंद झालेले अनेक रस्ते खुले झाल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. महसूल विभागात सध्या मोठ्या प्रमाणावर बदल होत असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे आगामी पाच वर्षांत महसूल विभागाचा चेहरामोहरा बदललेला दिसेल, असा विश्वास अप्पर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांनी व्यक्त केला.

संगमनेर शहरातील नवीन नगर रोडवरील यशवंतराव चव्हाण मध्यवर्ती प्रशासकीय भवनाच्या सभागृहात बुधवारी (दि. ९) महात्मा ज्योतिबा फुले महसूल लोकअदालत अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अप्पर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रांताधिकारी अरुण उंडे, तहसीलदार धीरज मांजरे, नायब तहसीलदार मार्तंड माळवे, संदीप भांगरे, गणेश आढारी यांच्यासह महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. महसूल विभागात उल्लेखनीय व उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. विविध महसूलविषयक प्रकरणे मार्गी लावताना तसेच अतिक्रमणामुळे बंद झालेले रस्ते खुले करण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कामाचेही कौतुक करण्यात आले. अप्पर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे म्हणाले, महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आगामी काळातही अधिक चांगले काम करण्यावर भर द्यावा. उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कामाची निश्चितच दखल घेऊन त्यांचा सन्मान करण्यात येईल. गावागावातील पाणंद रस्ते आणि शिवार रस्त्यांची प्रलंबित कामे प्राधान्याने मार्गी लावावीत. यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी दूर होतील आणि संबंधित अधिकाऱ्यांचेही त्या गावात चांगले नाव होईल.

महसूल विभागाच्या कामकाजात दिवसेंदिवस बदल होत आहेत. प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान, पारदर्शक आणि सुलभ करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविला जात आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापरही महसूल विभागाच्या कामकाजात वाढणार आहे.


॥ अर्थो रक्षति रक्षित ॥

## महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संगमनेर

अशोक चौक, संगमनेर ४२२६०५. फोन: ०२४२५-२२०७७७, २२१७७०

रजि. नं.: ANR/SNR/RSR/(CR)3833 रजि. दि. १३/१/२००४

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**फक्त सभासदांसाठी**

संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, रविवार, दिनांक २७/०९/२०२६ रोजी दुपारी ४.०० वा. श्री. मु.र. भंडारी मंगल कार्यालय, अशोक चौक, संगमनेर येथे संस्थेचे सन २०२५-२०२६ या वर्षाचे **चेअरमन इंजि. दिनेश जगन्नाथ सोमाणी** यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) मागील दि. २५/०८/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दि. १४/१०/२०२५ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
३) सन २०२५-२०२६ अखेरचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
४) मा. शासकीय (वैधानिक) लेखापरिक्षक व मा. अंतर्गत लेखापरिक्षक यांनी दिलेल्या सन २०२५-२०२६ च्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
५) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे.
६) सन २०२६-२०२७ करिता तयार केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
७) सन २०२६-२०२७ करिता शासकीय (वैधानिक) लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
८) सन २०२६-२०२७ करिता अंतर्गत लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
९) सन २०२४-२०२५ च्या शासकीय लेखापरिक्षण अहवालातील दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
१०) सामोपचार परतफेड योजने अंतर्गत परतफेड झालेल्या कर्ज खात्याच्या माहितीची नोंद घेणे.
११) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणारे विषय.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
**दिगंबर दत्तात्रय आडकी**
व्यवस्थापक तथा कार्यलक्षी संचालक
महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संगमनेर

दिनांक – १२/०९/२०२६
स्थळ – संगमनेर

**सुचना–**

१) सभासदांना कोणत्याही प्रकारची माहिती सर्वसाधारण सभेमध्ये पाहिजे असेल, अहवालातील कोणत्याही माहिती बाबत प्रश्न विचारावयाचे असतील अथवा सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी दि. २२/०९/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत संस्था कार्यालयात लेखी पाठवाव्यात. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.
२) सभेची गणपूर्ती (कोरम) पूर्ण न झाल्यास अर्धा तास प्रतिक्षा करून, त्याच दिवशी त्याच ठिकाणी सभा सुरु होईल. त्यावेळी गणपूर्तीचा विचार केला जाणार नाही.








आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# रात्रीचे लोडशेडिंग बंद करा; अन्यथा रास्ता रोकोचा इशारा

## खांजापूर, सुकेवाडी, कुरण, सायखिंडी, समनापूर, मालदाड परिसरातील ग्रामस्थांचे महावितरणला निवेदन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील खांजापूर, सुकेवाडी, कुरण, सायखिंडी, समनापूर, मालदाड व परिसरातील गावांमध्ये रात्रीच्या वेळी सुरू असलेले मोठ्या प्रमाणावरील लोडशेडिंग तातडीने बंद करावे, अशी मागणी समस्त ग्रामस्थांच्या वतीने संगमनेर येथील विद्युत महामंडळाच्या कार्यकारी अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. रात्रीचे लोडशेडिंग बंद न केल्यास विद्युत कार्यालयासमोर आंदोलन करण्यासह महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, परिसरातील शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी शेतीसाठी पाणी देण्याची वेळ येते. मात्र, त्याचवेळी वीजपुरवठा खंडित होत असल्याने शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. त्यातच परिसरात बिबट्यांची मोठी दहशत असून, रात्रीच्या अंधारात शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. दूध व्यवसायावर अवलंबून असलेल्या कुटुंबांनाही लोडशेडिंगचा मोठा फटका बसत आहे.

विशेषतः दूध काढण्याच्या वेळेतच वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने दूध उत्पादक शेतकऱ्यांसमोर गंभीर अडचण निर्माण झाली आहे. एका शेतकऱ्याकडे दररोज शंभर ते दीडशे लिटरपर्यंत दूध उत्पादन होत असल्याने ते सर्व दूध हाताने काढणे शक्य नसते. दूध काढण्यासाठी विद्युत यंत्रणेची आवश्यकता असते. त्यामुळे ऐन दूध काढण्याच्या वेळी होणारे लोडशेडिंग तातडीने थांबवावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

दरम्यान, सध्या श्रावण महिन्यात अनेक गावांमध्ये अखंड हरिनाम सप्ताह सुरू असून, तेथेही वीजपुरवठा खंडित होत असल्याने भाविकांची गैरसोय होत आहे. आगामी काळात गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि दिवाळीसारखे महत्त्वाचे सण येत असल्याने रात्रीचे लोडशेडिंग सुरू राहिल्यास नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे.

त्यामुळे महावितरणने ग्रामस्थांच्या अडचणींचा गांभीर्याने विचार करून रात्रीच्या वेळेचे लोडशेडिंग तातडीने बंद करावे. अन्यथा यांजापूर, सुकेवाडी, कुरण, सायखिंडी, समनापूर, मालदाड व परिसरातील ग्रामस्थ संगमनेर येथील विद्युत कार्यालयासमोर आंदोलन करतील. त्यानंतरही प्रश्न मार्गी न लागल्यास महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनावर अशोक सातपुते, भारत कुटे, महेश सातपुते, चेतन सातपुते यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी व ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सह्याद्री ज्युनिअर कॉलेजमध्ये शिक्षक दिन उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- भाऊसाहेब गुंजाळ पाटील सह्याद्री ज्युनिअर कॉलेज, संगमनेर येथे भारताचे माजी राष्ट्रपती व शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज संस्थेचे संचालक प्रा. बाबा खरात, प्राचार्य एस. एम. खेमनर, उपप्राचार्य प्रा. एन. बी. काळे, विभागप्रमुख दातीर ए. के. यांच्यासह प्राध्यापक-प्राध्यापिका उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयी मनोगत व्यक्त करून कृतज्ञता, प्रेम व आदरभावना व्यक्त केली. शिक्षक हे विद्यार्थ्यांना ज्ञानासोबत संस्कार व जीवनाची योग्य दिशा देणारे मार्गदर्शक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रा. एन. आर. जगताप, भालेराव सर, भुसाळ मॅडम व दळवी मॅडम यांनीही मनोगत व्यक्त केले.

उपप्राचार्य प्रा. एन. बी. काळे यांनी शिक्षकांच्या समाजनिर्मितीतील भूमिकेवर प्रकाश टाकला. प्राचार्य एस. एम. खेमनर यांनी प्रेरणादायी उदाहरणे देत विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

संचालक प्रा. बाबा खरात यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा आदर करून त्यांच्या मार्गदर्शनाचा जीवनात उपयोग करावा, असा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पायल निळे, संस्कृती आंबरे व दिव्या वाकचौरे यांनी केले. आयोजनासाठी विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. आभार प्रदर्शन अंजली बोटे यांनी केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम आनंददायी वातावरणात पार पडला.

# शिक्षकांचे समाजावर मोठे ऋण – भाऊ जाखडी



युवावार्ता(प्रतिनिधी)

संगमनेर - शिक्षक हे केवळ ज्ञानदानाचे कार्य न करता सुविचारी आणि संस्कारक्षम पिढी घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. त्यामुळे शिक्षकांचे समाजावर मोठे ऋण आहे, असे प्रतिपादन पुरोहित प्रतिष्ठानचे अध्यक्ष भाऊ जाखडी यांनी केले.

भारताचे द्वितीय राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिनाचे औचित्य साधून पुरोहित प्रतिष्ठान व हरिहर प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांचा विशेष सन्मान करण्यात आला. मेन रोडवरील हरिहर केशव गोविंद मंदिरात हा कार्यक्रम झाला. यावेळी संगमनेरमधील विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये कार्यरत तसेच माजी शिक्षकांचा गौरव करण्यात आला. सत्काराबरोबरच नवीन शैक्षणिक धोरण, मातृभाषेतून शिक्षण, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि संस्कारक्षम शिक्षण या विषयांवर शिक्षकांशी मनमोकळा संवाद साधण्यात आला.

मातृभाषेमुळे विद्यार्थ्यांना विषय सहज समजतो तसेच त्यांच्या विचारशक्ती, सर्जनशीलता आणि अभिव्यक्तीला चालना मिळते. शिक्षणाबरोबरच भारतीय संस्कृती, परंपरा, मूल्ये व संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली.

भाऊ जाखडी म्हणाले की, संगमनेरमधून शिक्षण घेऊन अनेक व्यक्तींनी राज्य, देश आणि विदेशात आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. या यशामागे शिक्षकांचे मोठे योगदान आहे. ज्ञानदान हे सर्वश्रेष्ठ दान असून शिक्षक विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देतात. समाजाच्या जडणघडणीत शिक्षकांचे योगदान लक्षात घेऊन त्यांच्या विधायक कार्याला प्रोत्साहन देणे ही सर्वांची जबाबदारी आहे.

यावेळी चंद्रशेखर कानडे, मुकुंद डांगे, सांगळे, दर्शन जोशी, एरंडे, हिंरे, गोरे, बुलाखे, ठोंबरे, श्रीमती पाटील, तसेच मालपाणी विद्यालयाचे माजी प्राचार्य दिलीप उदमले, सौ. पुष्पा उदमले, दौलत पवार, शशांक गंधे, उत्तम एरंडे, गुंजाळ मॅडम, रेंगे मॅडम व पद्मनाशी मॅडम यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी पुरोहित प्रतिष्ठानचे अध्यक्ष भाऊ जाखडी, उपाध्यक्ष संदिप वैद्य तसेच हरिहर प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुहास बेलापुरकर यांच्यासह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना शिक्षकांनी प्रतिष्ठानच्या उपक्रमांचे कौतुक केले.

# ट्रेंडपेक्षा उद्दिष्ट, भावनेपेक्षा अभ्यास आणि घाईपेक्षा नियोजन महत्त्वाचे : सुनील कडलग

युवावार्ता (प्रतिनिधी)

बेल्हे-आळेफाटा - सोशल मीडियावरील रिल्स, ट्रेंड आणि ऑनलाइन चर्चांच्या प्रभावातून प्रेरित होऊन भावनिक पद्धतीने गुंतवणुकीचे निर्णय घेणे तरुणांसाठी आर्थिकदृष्ट्या धोकादायक ठरू शकते. सोशल मीडियावर मिळणारी माहिती प्रत्येक वेळी अचूक किंवा प्रत्येक गुंतवणूकदारासाठी योग्य असेलच असे नाही. त्यामुळे गुंतवणूक करताना अभ्यास, योग्य नियोजन आणि तज्ज्ञ मार्गदर्शनाला प्राधान्य देत 'गुंतवणूक भान' जपणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन गुंतवणूक क्षेत्रातील अभ्यासक व सामाजिक कार्यकर्ते सुनील कडलग यांनी केले.

समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बेल्हे-बांगरवाडी येथील व्यवस्थापन विभागाच्या (एमबीए) वतीने एआयसीटीई प्रशिक्षण व शिक्षण (अटल) अकादमीच्या प्रायोजकत्वाखाली 'डिजिटल युगातील प्रायोगिक आणि उपयोजित वर्तणूक वित्त' या विषयावर सहा दिवसीय प्राध्यापक विकास कार्यक्रमाचे (ऋड्ढ) आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी कडलग बोलत होते.

कडलग म्हणाले, रिल्समध्ये एखादी गुंतवणूक लोकप्रिय दिसते म्हणून ती आपल्यासाठी योग्य असेलच असे नाही. गुंतवणुकीत ट्रेंडपेक्षा उद्दिष्ट, भावनेपेक्षा अभ्यास आणि घाईपेक्षा नियोजन महत्त्वाचे आहे. गुंतवणुकीचा निर्णय घेताना उत्पन्न, आर्थिक उद्दिष्टे, जोखीम स्वीकारण्याची क्षमता आणि गुंतवणुकीचा कालावधी यांचा विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.



डिजिटल तंत्रज्ञानामुळे आर्थिक व्यवहार आणि गुंतवणुकीत मोठे बदल झाले असले, तरी त्याचबरोबर सायबर फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत. संशयास्पद लिंक, एपीके फाईल, बनावट व्हिडिओ कॉल किंवा डिजिटल पेमेंटच्या माध्यमातून नागरिकांची फसवणूक केली जात आहे. त्यामुळे सायबर साक्षरतेसोबतच आर्थिक साक्षर होणेही काळाची गरज असल्याचे कडलग यांनी स्पष्ट केले.

विश्वस्त वल्लभ शेळके यांनी डिजिटल युगातील आर्थिक साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित केले. आर्थिक व्यवहार, गुंतवणुकीचे निर्णय आणि ग्राहकांच्या वर्तनात होत असलेले बदल लक्षात घेता प्राध्यापकांनी वर्तनात्मक वित्त या विषयाचा सखोल अभ्यास करून आपले ज्ञान अद्ययावत ठेवावे, असे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. नवनाथ नरवडे यांनी बदलत्या तंत्रज्ञानानुसार अध्यापन क्षेत्रानेही नवे बदल स्वीकारण्याची गरज व्यक्त केली. विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, उद्योगविश्वाच्या गरजा आणि बदलत्या अर्थव्यवस्थेशी सुसंगत ज्ञान व कौशल्ये देण्यासाठी प्राध्यापकांनी सातत्याने नवे ज्ञान आत्मसात करावे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी लेखापरीक्षक गणेश बडे, कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत, समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. कुलदीप रामटेके, समर्थ कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. संतोष घुले, प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर, एमबीए विभागप्रमुख डॉ. महेश भास्कर आदी उपस्थित होते. यावेळी 'समर्थ शिक्षण' या नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले. सहा दिवसीय कार्यक्रमात वर्तनात्मक वित्त, डिजिटल अर्थव्यवस्था, गुंतवणूकदारांची मानसिकता, आर्थिक निर्णयांवरील मानसशास्त्रीय घटक आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा आर्थिक व्यवहारांवरील परिणाम या विषयांवर तज्ज्ञांची व्याख्याने व प्रशिक्षण सत्रे होणार आहेत.

कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके आणि माजी जिल्हा परिषद सदस्य स्नेहलताई शेळके यांनी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन प्रा. अमिता खंडागळे व प्रा. डॉ. शशिकांत ताजने यांनी केले, तर डॉ. रुस्तुम दराडे यांनी आभार मानले.

# माजी विद्यार्थ्याची शाळेसाठी लाखमोलाची भेट

## माझा गाव, माझी शाळा, माझा अभिमान उपक्रमाला बळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -'माझा गाव, माझी शाळा, माझा अभिमान' ही भावना जपत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हिवरगाव पावसा येथील माजी विद्यार्थी विठ्ठल साईराम पावसे यांनी आपल्या शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करत तब्बल एक लाख रुपये किमतीचे पाच संगणक संच देणगी म्हणून उपलब्ध करून दिले आहेत. या संगणकांमुळे शाळेतील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण घेण्याची मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

'मिशन आपुलकी' अंतर्गत विठ्ठल पावसे यांच्या प्रयत्नातून हे संगणक संच शाळेच्या आयसटी लॅबसाठी देण्यात आले. गावातील ज्येष्ठ नागरिक साईराम भिका पावसे उर्फ काकाजी यांचे ज्येष्ठ चिरंजीव असलेल्या विठ्ठल पावसे यांनी ज्या शाळेत प्राथमिक शिक्षण घेतले, त्या शाळेची आठवण आणि ऋणानुबंध जपत विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी ही अनमोल देणगी दिली. त्यांच्या या उपक्रमाचे ग्रामस्थ, माजी विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती तसेच शिक्षकवर्गातून कौतुक होत आहे. शाळेचे मुख्याध्यापक आर. पी. राहणे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या वर्षभरापासून शाळेचा चेहरामोहरा बदलण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. शाळेची वाटचाल आता आदर्श व उपक्रमशील शाळेच्या दिशेने सुरू असून विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि आधुनिक शिक्षण देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

दरम्यान, शाळेच्या जुन्या चार वर्गखोल्यांचे निर्लेखन पूर्ण झाले असून दोन नवीन वर्गखोल्यांच्या उभारणीचे काम सुरू आहे. शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत, माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थ यांच्या सहकार्याने शाळेसाठी सुसज्ज इमारत उभारण्याचा प्रयत्न सुरू आहे. यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार अमोल खताळ तसेच नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे यांच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत.

लवकरच नव्याने उभारण्यात येणाऱ्या आयसीटी लॅबचे उद्घाटन करून ती विद्यार्थ्यांसाठी खुली करण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगणक शिक्षणाची प्रत्यक्ष अनुभूती मिळून त्यांच्या डिजिटल कौशल्यांना चालना मिळणार आहे. संगणक संच उपलब्ध करून दिल्याबद्दल संगमनेर तालुका गटशिक्षणाधिकारी श्री. गुंड, विस्तार अधिकारी श्रीमती नंदा वलवे आणि केंद्रप्रमुख रुपेश वाकचौरे यांनी विठ्ठल पावसे यांचे अभिनंदन केले. या देणगीबद्दल शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरद पावसे, उपाध्यक्ष सोमनाथ भालेराव व सर्व सदस्य, सरपंच सुभाष गडाख, उपसरपंच सुजाताई दवंगे, मुख्याध्यापक आर. पी. राहणे, राजेश नवले, हरिभाऊ सहाने आदींनी आभार व्यक्त करून अभिनंदन केले.

# वेल्हाळे अंगणवाडीत 'सदृढ बालक, समृद्ध भारत' कार्यक्रम उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

वेल्हाळे - 'सदृढ बालक, समृद्ध भारत' या संकल्पनेतून अंगणवाडी ही बालकांच्या सर्वांगीण विकासाची आधारशिला असून, त्यातूनच सशक्त भारताची पायाभरणी होते. याच उद्देशाने वेल्हाळे येथील भांडभळा अंगणवाडी येथे 'समग्र बालविकास, सशक्त भारत, सशक्त अंगणवाडी' हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमात गर्भवती माता व बालकांचे आरोग्य, पोषण, पूर्वप्राथमिक शिक्षण, बालकांचा सर्वांगीण विकास, माता समिती व ग्रामस्थांचा सहभाग तसेच सुरक्षित, स्वच्छ व आदर्श अंगणवाडी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक बालक शिक्षित, निरोगी आणि आनंदी राहावे, त्याला योग्य संस्कार व पोषण मिळावे, यासाठी पालकांनी आणि समाजाने एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाच्या निमित्ताने अंगणवाडीमध्ये विविध उपक्रम व माहितीपर दालने उभारण्यात आली होती. माता-पालक तसेच उपस्थित अंगणवाडी सेविकांनी या सर्व दालनांची पाहणी करून त्याची माहिती घेतली. अनेक पालकांनी दालनांमधील माहितीचे फोटो काढून ते संग्रहीत केले. यावेळी अंगणवाडीतील बालकांनी सादर केलेली गवळण, स्वागतगीत तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. बालकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. कार्यक्रमाबाबत पर्यवेक्षक भारती वाडकर, संगीता पवार, साहिल सातपुते यांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमास सरपंच विष्णू आव्हाड, गोरख शिरतार, सुनील जाधव, अमोल सोनवणे यांच्यासह मोठ्या संख्येने माता-पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## संपादकीय...

# डिजिटल युगात तरुण बेरोजगार का ?

आजच्या तरुणाईच्या हातात जगभराची माहिती देणारा मोबाईल आहे. काही सेकंदांत शिक्षण, तंत्रज्ञान, उद्योग, परदेशातील संधी, नोकऱ्या आणि जगातील घडामोडी त्यांच्यापर्यंत पोहोचतात. डिजिटल युगाने तरुणांच्या हातात प्रचंड ताकद दिली आहे. मात्र, या ताकदीसोबत एक मूलभूत प्रश्न अधिक तीव्रतेने उभा राहतो- तरुणांच्या हातात मोबाईल आहे; पण रोजगार कुठे आहे? मोबाईलच्या माध्यमातून तरुण आज ऑनलाइन अभ्यास करतो, कौशल्ये शिकतो, विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करतो, नोकरीच्या जाहिराती शोधतो. सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून स्वतःचा व्यवसाय उभा करण्याचाही प्रयत्न करतो. पण शिक्षण पूर्ण केल्यानंतर स्थिर रोजगार मिळवताना त्याची खरी परीक्षा सुरू होते. पदवी हातात असूनही अनुभवाची अट, कौशल्य असूनही संधींचा अभाव आणि संधी मिळाली तरी अपेक्षेपेक्षा अत्यल्प वेतन- या चक्रात अनेक तरुण अडकलेले दिसतात. शिक्षण आणि रोजगार यांच्यातील दरी वाढत आहे, ही वस्तुस्थिती दुर्लक्षित करून चालणार नाही. दरवर्षी हजारो विद्यार्थी पदवी, पदविका आणि विविध व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करतात. परंतु उद्योगांना ज्या कौशल्यांची गरज आहे, ती कौशल्ये अनेक विद्यार्थ्यांकडे नसतात. दुसरीकडे शिक्षण व्यवस्थेत केवळ पदवी मिळवण्यावर भर राहिल्याने प्रत्यक्ष कामाचा अनुभव, संवादकौशल्य, तंत्रज्ञानाचा वापर, समस्या सोडवण्याची क्षमता आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षण याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. सरकारी नोकरीचे आकर्षण आजही मोठे आहे. सुरक्षितता, सामाजिक प्रतिष्ठा आणि स्थिर उत्पन्न यामुळे लाखो तरुण स्पर्धा परीक्षांकडे वळतात. एकाच पदासाठी हजारो अर्ज येतात. वर्षानुवर्षे तयारी करूनही अनेकांच्या पदरी निराशा येते. सरकारी नोकऱ्या महत्त्वाच्या आहेतच; मात्र प्रत्येक तरुणाला सरकारी नोकरी मिळणे शक्य नाही. त्यामुळे सरकारी नोकरीच्या पलीकडे रोजगाराच्या व्यापक संधी निर्माण करणे ही काळाची गरज आहे. यासाठी केवळ मोठ्या उद्योगांची वाट पाहून चालणार नाही. स्थानिक पातळीवर उद्योग, लघुउद्योग, स्टार्टअप, सेवा क्षेत्र आणि ग्रामीण उद्योजकता यांना चालना देणे आवश्यक आहे. एखाद्या तालुक्यात उद्योग वाढले तर केवळ काही तरुणांनाच नव्हे, तर वाहतूक, हॉटेल, दुरुस्ती सेवा, लॉजिस्टिक्स, किरकोळ व्यवसाय, तंत्रज्ञान सेवा अशा अनेक क्षेत्रांना रोजगार मिळतो. त्यामुळे रोजगाराचा प्रश्न हा केवळ नोकरी देण्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण स्थानिक अर्थव्यवस्थेशी जोडलेला आहे. आजचा तरुण नोकरी शोधणारा असण्याबरोबरच नोकरी निर्माण करणारा होऊ शकतो. डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे हे पूर्वीपेक्षा अधिक शक्य झाले आहे. ई-कॉमर्स, डिजिटल मार्केटिंग, ग्राफिक डिझाईन, व्हिडिओ एडिटिंग, सॉफ्टवेअर, ऑनलाइन शिक्षण, कृषी-तंत्रज्ञान, फूड प्रोसेसिंग, पर्यटन आणि विविध सेवा क्षेत्रात तरुणांसाठी नव्या संधी निर्माण होत आहेत. मात्र या संधींचा लाभ घेण्यासाठी प्रशिक्षण, मार्गदर्शन, भांडवल आणि बाजारपेठेची जोड आवश्यक आहे. मोबाईल हा रोजगाराचा पर्याय नाही; तो रोजगारापर्यंत पोहोचण्याचे साधन बनला पाहिजे. आज अनेक तरुण तासन्तास रील्स, शॉर्ट्स आणि मनोरंजनाच्या सामग्रीमध्ये वेळ घालवतात. त्याच मोबाईलचा उपयोग कौशल्य शिकण्यासाठी, व्यवसाय उभारण्यासाठी, ग्राहक शोधण्यासाठी आणि ज्ञान वाढवण्यासाठी केला तर परिस्थिती बदलू शकते. प्रश्न मोबाईलचा नाही; प्रश्न त्याच्या वापराच्या दिशेचा आहे. युवकांच्या रोजगारासाठी सरकार, उद्योग, शिक्षणसंस्था आणि समाज या चौघांनी एकत्र काम करण्याची गरज आहे. महाविद्यालयीन शिक्षणासोबत उद्योगाभिमुख प्रशिक्षण, अप्रेंटिसशिप, इंटर्नशिप आणि प्रत्यक्ष कामाचा अनुभव अनिवार्य करण्याचा विचार झाला पाहिजे. स्थानिक उद्योगांच्या गरजेनुसार अभ्यासक्रम तयार झाले पाहिजेत. रोजगार मेळावे केवळ औपचारिक न राहता प्रत्यक्ष नियुक्त्यांपर्यंत पोहोचले पाहिजेत. आजचा तरुण संधी मागत आहे; सहानुभूती नव्हे. त्याला आश्वासनांपेक्षा कौशल्य, भांडवल, मार्गदर्शन आणि बाजारपेठ हवी आहे.

**CHANGE IN NAME**

**I HAVE CHANGED MY OLD NAME**
PRAMILA BALU NAVALE

**TO NEW NAME**
PADMA BALU NAVALE

BY AFFIDAVIT NO 1224/2026
DATE -08/09/2026

ADD- BHIMNAGAR SANGAMNER KHURD,TAL.SANGAMNER AHILAYANAGAR,422605

**CHANGE IN NAME**

**I HAVE CHANGED MY OLD NAME**
SANGEETA SURESH WALHEKAR

**TO NEW NAME**
SANGITA SURESH WALHEKAR

BY AFFIDAVIT NO 1225/2026
DATE- 09/09/2026

ADD- FLAT N. 11, PANCHATARANI HSG SOC CANAL ROAD, JAIL ROAD, NASHIK ROAD, NASHIK

## कायद्याचे उल्लंघन करू नका; कारवाईची वेळ आणू नका

### गणेश मंडळांना सहायक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांचा इशारा



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांनी डीजे, ध्वनिप्रदूषण तसेच मिरवणुकीबाबत घालून दिलेल्या नियमांचे व शिस्तीचे काटेकोर पालन करावे. कायद्याचे उल्लंघन कोणीही करू नये आणि पोलिसांना कारवाई करण्याची वेळ आणू नये, असे आवाहन राजूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी केले.

राजूर परिसरातील गणेश मंडळांच्या पदाधिकारी व गणेशमूर्तिकारांची शांतता कमिटीची बैठक राजूर पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आली होती. यावेळी मार्गदर्शन करताना सहायक पोलीस निरीक्षक किशोर पवार बोलत होते. बैठकीस हद्दीतील गणेश मंडळांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, पदाधिकारी तसेच गणेशमूर्तिकार उपस्थित होते.

गणेश मंडळांसाठी ऑनलाइन परवाना घेणे बंधनकारक असून, मंडप उभारताना तो रस्त्यावर येणार नाही याची दक्षता घ्यावी. गणेशमूर्ती स्थापना व विसर्जनाच्या वेळी पारंपरिक वाद्यांचा वापर करावा. डीजे व डॉल्बीचा वापर करू नये, तसेच ध्वनिक्षेपकाच्या आवाजाची व वेळेची मर्यादा काटेकोरपणे पाळावी, अशा सूचना देण्यात आल्या.

गणेशोत्सवातील मिरवणुकीदरम्यान कोणाच्याही धार्मिक भावना दुखावतील, अशी वक्तव्ये किंवा गाणी लावू नयेत. पारंपरिक मिरवणूक मार्गात कोणताही बदल करू नये. उत्सवाच्या काळात सामाजिक व विधायक उपक्रमांवर भर द्यावा. तसेच उत्सवासाठी संबंधित सर्व विभागांकडून आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्रे घेणे बंधनकारक असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

गणेश मंडळांच्या ठिकाणी दिवसा व रात्री स्वयंसेवकांची उपस्थिती राहील, याची मंडळांनी दक्षता घ्यावी. सुरक्षेच्या दृष्टीने मंडळाच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशाही सूचना करण्यात आल्या. गणेशोत्सव काळात कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, यासाठी मंडळांनी पोलिसांना सहकार्य करावे. नियमांचे उल्लंघन अथवा अनुचित प्रकार आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

## भारतरत्न राजीव गांधी विद्यालय निमज येथे 'शिक्षक दिन'




युवावार्ता (प्रतिनिधी)

निमज- भारतरत्न राजीव गांधी विद्यालयात 'शिक्षक दिन' अत्यंत उत्साहात आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांनी साजरा करण्यात आला. या दिवशी इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांनी दिवसभरासाठी शालेय प्रशासन आणि प्रत्यक्ष अध्यापनाचा अनुभव घेत विद्यालयाचे संपूर्ण कामकाज यशस्वीरीत्या सांभाळले.

विद्यार्थी मुख्याध्यापक म्हणून इयत्ता १० वी चा विद्यार्थी वरद ज्ञानेश्वर मतकर याने पदाची धुरा सांभाळत सकाळपासूनच शाळेचे नियोजन, तासिकांचे व्यवस्थापन आणि प्रशासकीय शिस्त चोख ठेवली. इतर विद्यार्थ्यांनी शिक्षक, शिक्षिका तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भूमिका लिलया पार पाडत वर्गखोल्यांमध्ये अध्यापनाचा आनंद घेतला.

अध्यापनाचे सत्र पूर्ण झाल्यानंतर शिक्षक दिनाचा विशेष कृतज्ञता सोहळा पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात भारताचे माजी राष्ट्रपती, तत्त्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर विद्यार्थी मुख्याध्यापक वरद मतकर याने आपल्या प्रास्ताविकातून शिक्षक दिनाचे महत्त्व विशद केले व प्रशासकीय अनुभव मांडला. विद्यार्थी शिक्षक म्हणून अध्यापनाचा अनुभव घेणारे अविष्कार कासार आणि वैष्णवी गुंजाळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शिक्षकांचे दैनंदिन कष्ट, वर्गातील व्यवस्थापन आणि शिकवण्यामागची मेहनत आज प्रत्यक्ष अनुभवता आली; त्यामुळे शिक्षकांविषयीचा आदर अधिकच द्विगुणित झाला,अशी भावना या विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा यथोचित सत्कार करून त्यांच्याप्रती मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यालयात राबवण्यात आलेला थँक्यू टीचर - कृतज्ञता गॅलरी उपक्रम. या अंतर्गत विद्यार्थ्यांनी आपल्या लाडक्या शिक्षकांसाठी स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिलेली पत्रे, कविता, चारोळ्या व कृतज्ञता संदेश तयार करुन भावना व्यक्त केल्या विद्यार्थ्यांच्या या भावनिक व सर्जनशील मांडणीने उपस्थित शिक्षकांची मने जिंकली.

Sangam Sevabhavi Trust's
**Ayurved Mahavidyalaya, Sangamner**
pune-Nashik Road Sangamner, Dist- Ahilyanagar
Phone No-02425 228006 Email-sstayurved@gmail.com
Website:-sstayurved.edu.in

**पाहिजेत**

खालील पदावरील तात्पुरत्या स्वरुपात रिक्त जागा भरण्यासाठी पात्र उमेदवारांचे अर्ज मागवण्यात येत आहेत. रिक्त पदे व संवर्ग

| अ.न. | विभाग/विषय | प्राध्यापक | प्रपाठक | व्याख्याता |
|---|---|---|---|---|
| १ | कायचिकित्सा | 01 (OPEN) # 01 (SC) | - | 01 (OPEN) |
| २ | प्रसुति तंत्र & स्त्रीरोग | - | - | 01 (VJNT) 01 (SC) |
| ३ | शालाक्यतंत्र | - | - | 01 (SC) |
| ४ | इन्टोग्रेटीव्ह हेल्थ अ‍ॅन्ड ट्रान्सेशनल रिसर्च | 01 (OPEN) | - | - |

वरील सर्व पदांकरीता शैक्षणिक पात्रता व अनुभव हा NCISM, नवी दिल्ली, MUHS नाशिक व महाराष्ट्र शासन यांचे नियमाप्रमाणे राहील. वरील पदावर काम करण्यास इच्छुक असणाऱ्या पात्र उमेदवारांनी आपले अर्ज मा. अध्यक्ष, संगम सेवाभावी ट्रस्ट संचलीत. आयुर्वेद महाविद्यालय, संगमनेर, जि. अहिल्यानगर या पत्त्यावर आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्रांच्या सत्य प्रतिसह महाविद्यालयात जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांपुर्वी पोहचतील अशा पध्दतीने पाठवावेत.

**अध्यक्ष – संगम सेवाभावी ट्रस्ट संचलित, आयुर्वेदमहाविद्यालय, संगमनेर**

**पाहिजेत**
आमृता चहासाठी
**सेल्समन प्रमोटर**
(२ जागा, महिला)
पगार - १0000+
(बेसिक इंसेन्टीव्ह)
संपर्क- एस. आर. सेल्समन कार्पोरेशन (मार्केट यार्ड, संगमनेर)
7030501936
9904839193

**पाहिजेत**
ऑफिस बॉय (प्युन)
शिक्षणास प्राधान्य
कॉम्प्युटर ज्ञान,
स्वतःचे वाहन आवश्यक
- संपर्क -
8378956909
8459199913
बायोडाटा पाठवा

**पाहिजेत**
मेडिकल दुकानासाठी
महिला व मुले पाहिजे
**प्रभात मेडिकल**
नवीन नगर रोड,
ताजने मळी, संगमनेर
- संपर्क -
9921245753

**जागा विकणे आहे**
अतिशय उत्तम लोकेशन मधील मालदाड रोड, स्टेट बँक कॉलनी लगतची तहसील N. A. व सरकारी मोजीणी झालेली २ गुंठे उत्तरमुखी रहिवाशी चौरस जागा विकणे आहे.
**एजंट स्वागत**
- संपर्क -
9890468212

# जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

**पाहिजेत**
रिषभ गोल्ड अ‍ॅण्ड डायमंड
सल्समन - २
ड्रायव्हर - १
वॉचमेन - १
ठिकाण - मेनरोड, साईनाथ चौक, संगमनेर
9604334777
8669888777

**पाहिजेत**
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी
(चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

**पाहिजेत**
पेट्रोल पंपावर कामासाठी मुले पाहिजेत
पत्ता – तीन बत्ती चौक, दिल्ली नाका, संगमनेर
9860989807
9422225947

**फ्लॅट विकणे आहे**
- ठिकाण-
दिघी, पुणे, आळंदी रोड,
पर्पल ब्लुम सोसायटी,
साई पार्क रोड, प्लॉट नं. सी-108
क्षेत्रफळ - 585, फुली फर्निचर,
1 बीएचके 80 स्क्वे फुट बाल्कणी
किचन ट्रॉली, बेड,
सोफा, टिव्ही युनिट
8379064040
9960984718

**आकर्षक पगारावर जागा भरणे आहे**
**सुपरवायझर**
पूर्णवेळ [पुरुष] : ०२ पदे
शैक्षणिक पात्रता: १२वी / आयटीआय उत्तीर्ण
(स्वतःची टु व्हिलर असणे अवश्यक)
**ऑफिस असिस्टंट**
अर्धवेळ [पुरुष / महिला]
शैक्षणिक पात्रता: १०वी / १२वी उत्तीर्ण
- संपर्क -
उमंग इन्फ्राटेक
7875455777

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

FinanCity
STOP THINKING, START INVESTING
**उत्कृष्ट करिअर संधी तुमच्यासाठी !**
उत्तम संधी, उत्तम करिअर आणि उज्वल भविष्य तुमच्या प्रतीक्षेत आहे
**१२ सप्टेंबरपर्यंत मुलाखत सुरू आहे**
**बँक ऑफिस - २५ जागा (महिला)**
डेटा एन्ट्री व डॉक्युमेंटेशन रिपोर्ट तयार करणे, ऑफिस सपोर्टची कामे
पात्रता - कोणत्याही शाखेतील पदवीधर
**अ‍ॅडमिन / एचआर - २ जागा (महिला)**
प्रशासकीय कामे, कर्मचारी समन्वय, एचआर संबंधित कागदपत्रे
पात्रता- कोणत्याही शाखेतील पदवीधर
**फिल्ड वर्क सेल्स मॅनेजर- ५ जागा (पुरुष)**
फिल्ड भेटी व ग्राहक संपर्क, नवीन ग्राहक जोडणे, सेल्स टार्गेट पूर्ण करणे
पात्रता- कोणत्याही शाखेतील पदवीधर
**FINANCITY सोबत करिअर का घडवावे?**
आकर्षक पगार व कमिशन,करिअर मध्ये वाढीच्या संधी, मैत्रीपूर्ण कामाचे वातावरण, स्थैर्य आणि सुरक्षित भविष्य, परफॉर्मन्सवर आधारित प्रोत्साहन
**अधिक माहितीसाठी संपर्क करा**
7208095977 / 9623532907
फायनान्स सिटी, नेअर ग्रेव्ही यार्ड हॉटेल, अकोले बायपास रोड, संगमनेर

**पाहिजेत**
**सेल्समन**
(महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त
०१ बीएचके
रो - हाऊस
भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

**पाहिजेत**
सोनोग्राफी सेंटरसाठी मुलगी पाहिजे
कॉम्प्युटर व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक
(२ जागा त्वरीत भरणे आहे)
कामाची वेळ दु. १२ ते ८
संपर्क– जाधव सोनोग्राफी सेंटर
मर्चंट बँकेसमोर, नविन नगर रोड, संगमनेर
9307188862

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**नोकरीची सुवर्णसंधी**
**श्री गणेश टायर्स**
अकाऊंटंट - १
टॅली, जीएसटी ज्ञानास प्राधान्य
सेल्स एक्झीक्युटिव्ह - १
बॅटरी व इंजिन ऑईलच्या विक्री क्षेत्रातील अनुभव
अनुभावानुसार आकर्षक पगार
पत्ता - तीन बत्ती चौक, संगमनेर
८९९९८६२७५९

**पाहिजेत**
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849

SR THORAT
**JOB**
GAGANGIRI PACKAGED PURITY

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
|---|---|---|---|
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar
Mobile Number – 9860100936/937
Sent the CV Following E-Mail Id:
admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com



# हजारवाडीत बाबीर बाबा यात्रा उत्साहात

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर

संगमनेर तालुक्यातील हजारवाडी (पानोडी) येथे श्रीक्षेत्र बुवाजी बाबा देवस्थान परिसरात दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री बाबीर बाबा गायखे यात्रा उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. यंदाच्या ३९व्या यात्रा उत्सवासाठी ग्रामस्थांसह परिसरातील भाविकांनी मोठी उपस्थिती लावत श्री बाबीर बाबांचे श्रद्धापूर्वक दर्शन घेतले.

मंगळवार, दि. ८ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता श्री बाबीर बाबांची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि बाबीर बाबांच्या जयघोषात निघालेल्या पालखी मिरवणुकीत ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले. पालखीचे दर्शन घेण्यासाठी परिसरातील भाविकांनी गर्दी केली होती. त्यामुळे संपूर्ण हजारवाडी परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी सकाळी गजोनृत्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या महाप्रसादाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. यात्रा उत्सवाच्या सांगता सोहळ्यानिमित्त हरिकीर्तनाचेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी रामेश्वर देवस्थान, वरवंडी येथील महाधिपती ह.भ.प. महंत दत्तागिरीजी महाराज यांचे सुमधुर कीर्तन झाले. त्यांच्या आध्यात्मिक व भक्तिपर प्रवचनातून उपस्थित भाविकांना धार्मिक संदेश मिळाला. या यात्रा उत्सवाच्या निमित्ताने हजारवाडी तसेच परिसरातील भाविकांनी मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहून श्री बाबीर बाबांचे दर्शन घेतले.

# गोविंदा पथकाच्या इच्छेखातर आ. खताळ यांनी फोडली दहीहंडी



## पुण्याच्या महिलांना दहीहंडी सलामी देण्याचा पहिला मान

संगमनेर/ प्रतिनिधी

आतापर्यंत विविध गोविंदा पथकांनी मानवी मनोरे रचत दहीहंडी फोडली आहे असे अनेकदा पाहायला मिळाले आहे . मात्र, संगमनेरला यावर्षी आमदारा खताळ युवा मंचच्या वतीने आयोजित दहीहंडी उत्सवाने एक वेगळा आदर्श निर्माण केला. आमदार अमोल खताळ पाटील युवा मंचच्यावतीने प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या या दहीहंडी उत्सवाची सलामी देण्याचा पहिला मान पुणे कसबा येथील जुनी जोगेश्वरी रणरागिणी महिला गोविंदा पथकाच्या महिलांना देण्यात आला. महिलांच्या सन्मानाला प्राधान्य देत घेण्यात आलेल्या या निर्णयाचे उपस्थितांनी स्वागत केले.

संगमनेर बसस्थानक परिसरात गोकुळाष्टमीचे औचित्य साधून आमदार अमोल खताळ पाटील युवा मंच यांच्यावतीने दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.या उत्सवासाठी पुणे, ठाणे तसेच जुन्नर तालुक्यातील गोविंदा पथके सहभागी झाली होती.पुणे कसबा येथील जुनी जोगेश्वरी महिला रणरागिणी गोविंदा पथक यांनी सर्वप्रथम चार थरांचा मानवी मनोरा रचत दहीहंडीला सलामी दिली. त्यानंतर ठाणे येथील जय हनुमान गोविंदा पथकाने एक दोन तीन नव्हे तब्बल सात थरांचा मनोरा उभारून उपस्थितांची मने जिंकली. शेवटी शिवशंभो गोविंदा पथक, शिवजन्मभूमी ओतूर (ता. जुन्नर) यांनी पाच थरांचा मनोरा रचत दहीहंडी उत्सवात चांगलीच रंगत आणली. आमदार अमोल खताळ पाटील युवा मंच पहिल्याच वर्षीच्या या दहीहंडीची हंडी फोडण्याचा मान महिलांना देण्याचा आयोजकांचा मानस होता. मात्र, पहिलीच दहीहंडी असल्यामुळे उपस्थित सहभागी सर्व गोविंदा पथकांनी पहिल्या वर्षाची दहीहंडी आमदार अमोल खताळ यांनीच फोडावी, अशी आग्रही इच्छा व्यक्त केली.

गोविंदा पथकांच्या भावनेचा आदर करत आमदार खताळ यांनी हे आव्हान स्वीकारले. ठाणे येथील जय हनुमान गोविंदा पथकाने उभारलेल्या तीन थरांच्या मानवी मनोऱ्यावर आमदार खताळ स्वतः चढले. 'बोल बजरंगबली की जय, जय सियाराम, छत्रपती शिवाजी महाराज की जय' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. प्रचंड गर्दीच्या साक्षीने आमदार खताळ यांनी मानवी मनोऱ्यावर चढून दहीहंडी फोडताच उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट आणि जल्लोष केला. ढोल-ताशांचा गजर, गोविंदा पथकांची थरारक कसरत,आणि घोषणाबाजी नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे संपूर्ण बसस्थानक परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. संगमनेर शहर आणि तालुक्यातील महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**संगमनेरमध्ये यापूर्वी दहीहंडी उत्सवाचे आयोजन होत नव्हते. विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाने या उत्सवाची सुरुवात केली. यंदा महायुतीच्यावतीने दहीहंडी उत्सव सुरू करण्यात आला आहे. विशेष म्हणजे महिलांना प्रथम मान देऊन दहीहंडीची सलामी देण्यात आली, ही संगमनेरसाठी आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. पुढील वर्षी आठ थरांची दहीहंडी आयोजित करण्याचा मानस आहे.**

**आ. अमोल खताळ, संगमनेर**

# वारंवार खंडित वीजपुरवठ्याने पिके संकटात

## साकूर महावितरण कार्यालयात शेतकऱ्यांचा ठिय्या

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - साकूर व परिसरातील शेतकऱ्यांना गेल्या काही दिवसांपासून विजेच्या लपंडावाचा मोठा फटका बसत असून, कमी दाबाचा वीजपुरवठा, वारंवार वीज खंडित होणे आणि वाढत्या भारनियमनामुळे शेतीपिके संकटात सापडली आहेत. संतप्त शेतकऱ्यांनी बुधवारी साकूर येथील महावितरण कार्यालयावर ठिय्या देत अधिकाऱ्यांना घेराव घातला. यावेळी महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देत सात दिवसांत वीजपुरवठा सुरळीत न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

सध्या खरीप हंगामातील पिकांना पाण्याची गरज असताना वीजपुरवठ्याच्या अनियमिततेमुळे शेतकऱ्यांसमोर मोठे संकट निर्माण झाले आहे. सायंकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत भारनियमन होत असल्याने शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी शेतात जाऊन पिकांना पाणी द्यावे लागत आहे. मात्र, परिसरात वन्यप्राण्यांचा वावर असल्याने रात्रीच्या वेळी शेतात जाणे धोकादायक ठरत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

त्यातच वीजपुरवठा सुरू असतानाही कमी दाबाने वीज मिळत असल्याने कृषी पंप सुरळीत चालत नाहीत. अनेकदा पंप जळण्याच्या घटना घडत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. उपलब्ध असलेल्या मर्यादित पाण्यावर पिके वाचविण्यासाठी शेतकरी धडपडत असताना महावितरणच्या अनियमित कारभारामुळे त्यांच्या अडचणीत आणखी भर पडत आहे.

वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने पिकांना वेळेवर पाणी देता येत नाही. परिणामी पिकांची वाढ खुंटण्याबरोबरच उत्पादनावरही गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांच्या शेतीपंपांना पूर्ण दाबाने व नियमित वीजपुरवठा करावा, भारनियमनाच्या वेळेत बदल करावा तसेच वारंवार होणारे वीजखंडित होण्याचे प्रकार तातडीने थांबवावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

शेतकऱ्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना परिस्थितीची तीव्रता निदर्शनास आणून देत, सात दिवसांत समस्या मार्गी न लागल्यास अधिक तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा दिला आहे. या आंदोलनात संगमनेर बाजार समितीचे सभापती शंकर खेमनर, साकूर सोसायटीचे चेअरमन इंद्रजीत खेमनर, बाळासाहेब सागर, अनमोल खेमनर, सचिन सोनवणे, जयराम ढेरंगे, रेवजी धुळगंड, नामदेव खेमनर, विठुराज मैड, लक्ष्मण कुदनर, भाऊसाहेब डोलनर यांच्यासह दरेवाडी, खंडेरायवाडी परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आता महावितरण या आंदोलनाची दखल घेऊन वीजपुरवठ्याची समस्या किती तत्परतेने मार्गी लावते आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळतो का, याकडे परिसराचे लक्ष लागले आहे.


**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर**

**ई- निविदा तथा ई-लिलाव सूचना क्र. ०१/२०२६-२०२७**

कामाचे नावः- उर्ध्व प्रवरा डाव्या कालव्यावरील अंत्य कालवा मौजे खंडाळा (ता. श्रीरामपूर) जि. अहिल्यानगर येथील कालवा खोदकामातून निघालेला मुरुम या साहित्याची ई-लिलाव पध्दतीने विक्री करणे.

ई-लिलावाव्दारे उर्ध्व प्रवरा डाव्या कालव्यावरील अंत्य कालवा कि.मी. १३ व कि.मी. १४ मधील खोदकामातून निघालेला मुरुम बदमड या साहित्याच्या ई-लिलावाबाबत सविस्तर माहितीचा तपशील ्.ारहरींशपवशीी.र्सेी.ळप या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

१) ई-लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ इच्छित असलेल्या लिलावदारांना ्.ारहरींशपवशीी.र्सेी.ळप या संकेत स्थळावर जाऊन पात्रता मिळविणेसाठी आवश्यक दस्ताऐवजांची ऑन लाईन पूर्तता करावी लागेल. तसेच त्याबाबत आवश्यक इसारा रक्कम इत्यादीची पूर्तता करावी लागेल.

२) इच्छुक लिलावदारांची दस्ताऐवज व अन्य बाबतची पडताळणी करुन त्यांना प्रत्यक्ष ई-लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होणेसाठी पात्र करण्यात येईल. केवळ पात्र लिलावदारांना या ई-लिलावामध्ये सहभागी होता येईल.

३) सदर बाबत अधिक तपशीलाकरीता खालील नमूद कार्यालयाकडे इच्छुक लिलावदारांना चौकशी करता येईल.

अ) कार्यकारी अभियंता, उर्ध्व प्रवरा कालवा विभाग, संगमनेर, दूरध्वनी क्र. ०२४२५ - २२३२४८

ब) उपविभागीय अधिकारी, उर्ध्व प्रवरा कालवा उपविभाग क्र. ०२, संगमनेर दूरध्वनी क्र. ०२४२५ - २२३२४८

इच्छुक लिलावदारांना दि.१०/०९/२०२६ (वेळ ११.०५) ते दि.१७/०९/२०२६ (वेळ १७.००) या कालावधीत www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर आवश्यक बाबींची ऑन लाईन पध्दतीने पूर्तता करता येईल. सदरील ई-लिलाव सूचने बाबतचा अधिकचा तपशील www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर तसेच विभागीय कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध आहे.

**जाक्र. उप्रधवि/लेशा/निविदा/ २३६५ /२०२६**
**कार्यकारी अभियंता**
**उर्ध्व प्रवरा धरण विभाग, संगमनेर यांचे कार्यालय**
eeupcsmgrgmail.com
**दिनांक:** 04/09/2026

**(अ.बा. कवडे)**
**कार्यकारी अभियंता**
**उर्ध्व प्रवरा धरण विभाग**
**संगमनेर**

**जिमाका/नगर/ जाहि/१११ /२०२६**


## दिनविशेष

१९६५: — भारतीय सैन्याने लाहोर जवळील बुर्की गाव ताब्यात घेतले.
१९६१: — विश्व प्रकृती निधी (World Wildlife Fund) ची स्थापना.
१९४४: — दुसरे महायुद्ध - रॉयल एअर फोर्सने डार्मस्टाट शहरावर केलेल्या बॉम्बफेकीमुळे ११,५०० नागरिक ठार.
१९४२: — आझाद हिंद सेनेने जन गण मन राष्ट्रगीत म्हणून गायले.
१९४१: — अमेरिकेने पेंटागॉन बांधायला सुरुवात केली.
१९१९: — अमेरिकन सैन्याने होंडुरास ताब्यात घेतले.
१९०६: — म. गांधींनी द. आफ्रिकेत सत्याग्रह हा शब्द पहिल्यांदा वापरला.
१८९३: — स्वामी विवेकानंद यांनी जागतिक सर्वधर्म परिषदेसमोर आपले गाजलेले भाषण केले.
१७९२: — होप हिरा चोरला गेला.
१७७३: — बेंजामिन फ्रँकलिनने रुल्स बाय विच ए ग्रेट एम्पायर मे बी रिड्युस्ड टू ए स्मॉल

## जन्म

१९८२: श्रीया शरण — तामिळ चित्रपट अभिनेत्री
१९७६: मुरली कार्तिक — भारतीय क्रिकेटर
१९३९: चार्ल्स गेशेके — ऍडॉब सिस्टमचे संस्थापक
१९१७: फर्डिनांड मार्कोस — फिलिपाइन्सचे १० वे राष्ट्राध्यक्ष (निधन: २८ सप्टेंबर १९८९ )
१९१५: पुपुल जयकर — सामाजिक कार्यकर्त्या आणि भारतीय कला व संस्कृतीच्या पुरस्कर्त्या (निधन: २९ मार्च १९९७ )
१९१२: अप्पासाहेब पंत — भारतीय मुत्सद्दी आणि स्वातंत्र्य सेनानी — पद्मश्री (निधन: ५ ऑक्टोबर १९९२ )
१९११: लाला अमरनाथ भारद्वाज — स्वतंत्र भारताच्या पहिल्या क्रिकेट संघाचे कर्णधार — पद्म भूषण (निधन: ५ ऑगस्ट २००० )
१९०१: कवी अनिल — ४० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (निधन: ८ मे १९८२ )
१९०१: आत्माराम रावजी देशपांडे — साहित्यिक आणि कवी (निधन: ८ मे १९८२ )
१८९५: विनोबा भावे — भूदान चळवळीचे प्रणेते — भारतरत्न, रॅमन मॅगसेसे पुरस्कार

## मृत्यू

२०११: अंजली गुप्ता — भारतीय सैनिक व पायलट
१९९८: एन. डी. नगरवाला — क्रिकेटपटू आणि क्रीडा महर्षी (जन्म: १० ऑक्टोबर १९०९ )
१९९३: अभी भट्टाचार्य — भारतीय अभिनेते
१९८७: महादेवी वर्मा — हिंदी कवयित्री, स्वातंत्र्यसैनिक, शिक्षणतज्ञ — पद्म विभूषण, पद्म भूषण, ज्ञानपीठ पुरस्कार (जन्म: २६ मार्च १९०७ )
१९७८: जॉर्जी मार्कोव्ह — बल्गेरियाचे कवी
१९७३: साल्वादोर ऍलेंदे — चिली या लॅटिन अमेरिकन देशाचे अध्यक्ष बनणारे पहिले मार्क्सवादी व्यक्ति (जन्म: २६ जून १९०८ )
१९७३: गुरूनीम करळी बाबा — भारतीय तत्त्वज्ञ
१९७१: निकिता क्रुश्चेव्ह — सोव्हिएत युनियनचे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १५ एप्रिल १८९४ )
१९६६: कॉलेट ई. वूलमन — अमेरिकन उद्योजक, डेल्टा एअर लाईन्सचे सहसंस्थापक (जन्म: ८ ऑक्टोबर १८८९ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**११ सप्टेंबर**

## १९०६ : महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिकेत 'सत्याग्रह' या संकल्पनेला दिला जन्म

११ सप्टेंबर १९०६ हा दिवस महात्मा गांधींच्या जीवनातील आणि जगाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांवर अन्यायकारक कायदे लादले जात असताना गांधीजींनी अन्यायाविरुद्ध अहिंसक पद्धतीने संघर्ष करण्याचा मार्ग स्वीकारला. याच संघर्षातून पुढे 'सत्याग्रह' ही प्रभावी संकल्पना आकाराला आली.त्या काळात दक्षिण आफ्रिकेतील ट्रान्सव्हाल सरकारने भारतीय नागरिकांवर कठोर निर्बंध लादण्याचा प्रयत्न केला. भारतीयांनी नोंदणी करून ओळखपत्र बाळगणे बंधनकारक करण्याचा प्रस्ताव होता. या कायद्यामुळे भारतीयांच्या स्वातंत्र्यावर आणि मानवी हक्कांवर गदा येणार होती. गांधीजींनी या अन्यायकारक कायद्याला विरोध करण्यासाठी भारतीय समाजाला एकत्र केले.११ सप्टेंबर १९०६ रोजी जोहान्सबर्ग येथे मोठी सभा झाली. या सभेत हजारो भारतीय उपस्थित होते. अन्यायकारक कायद्याचे पालन न करण्याची आणि त्यासाठी कोणतीही शिक्षा झाली तरी ती शांततेने स्वीकारण्याची शपथ घेण्यात आली. याच आंदोलनाने पुढे सत्याग्रहाचे स्वरूप घेतले.'सत्याग्रह' या शब्दाचा अर्थ केवळ आंदोलन किंवा विरोध असा नसून सत्यासाठी केलेला आग्रह असा होतो. गांधीजींच्या मते सत्य आणि अहिंसा ही संघर्षाची प्रमुख शस्त्रे होती. विरोधकाविषयी द्वेष न ठेवता अन्यायाला विरोध करणे, स्वतः कष्ट सहन करणे आणि हिंसेचा मार्ग न स्वीकारणे, ही सत्याग्रहाची मूलभूत तत्त्वे होती.गांधीजींनी सुरुवातीला या संघर्षासाठी इंग्रजीतील 'Passive Resistance' अर्थात निष्क्रिय प्रतिकार हा शब्द वापरला होता. मात्र, त्यांना हा शब्द आपल्या आंदोलनाचा नेमका अर्थ व्यक्त करणारा वाटत नव्हता. सत्य आणि नैतिक शक्तीवर आधारित या संघर्षासाठी स्वतंत्र संकल्पना आवश्यक असल्याने 'सत्याग्रह' हा शब्द पुढे रूढ झाला.दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाने गांधीजींच्या नेतृत्वाला नवी दिशा दिली. भारतीयांनी अन्यायकारक कायद्यांचे पालन करण्यास नकार दिला; मात्र त्यासाठी हिंसाचाराचा मार्ग स्वीकारला नाही. अनेक कार्यकर्त्यांना तुरुंगवास, दंड आणि इतर त्रास सहन करावा लागला. तरीही आंदोलनाची अहिंसक भूमिका कायम राहिली.दक्षिण आफ्रिकेतील या प्रयोगातून गांधीजींना सत्याग्रहाच्या शक्तीचा अनुभव आला. पुढे भारतात परतल्यानंतर त्यांनी याच तत्त्वांचा वापर चंपारण सत्याग्रह, खेडा सत्याग्रह, अहमदाबाद मिल आंदोलन, असहकार आंदोलन, मिठाचा सत्याग्रह आणि भारत छोडो आंदोलनाच्या व्यापक संघर्षात केला.सत्याग्रहामुळे स्वातंत्र्यलढ्याला केवळ राजकीय स्वरूप न राहता नैतिक आणि सामाजिक अधिष्ठान मिळाले. सत्य, अहिंसा, आत्मसंयम आणि अन्यायाविरुद्ध शांततामय प्रतिकार या तत्त्वांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याला व्यापक जनाधार मिळवून दिला.

# अंजली गुप्ता — भारतीय वायुदलातील धाडसी अधिकारी

**पुण्यतिथी विशेष**

११ सप्टेंबर २०११ रोजी माजी भारतीय वायुदल अधिकारी फ्लाइंग ऑफिसर अंजली गुप्ता यांचे निधन झाले. त्यांच्या कारकीर्दीभोवती निर्माण झालेला वाद, लष्करी न्यायप्रक्रिया आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांविरोधातील त्यांच्या आरोपांमुळे त्यांचे नाव भारतीय वायुदलाच्या इतिहासातील एका महत्त्वाच्या प्रकरणाशी जोडले गेले. मात्र, एक महत्त्वाची दुरुस्ती आवश्यक आहे—अंजली गुप्ता वैमानिक किंवा फायटर पायलट नव्हत्या; त्या भारतीय वायुदलाच्या Education Branch मधील अधिकारी होत्या. उपलब्ध नोंदीनुसार त्यांची नियुक्ती २२ जून २००१ रोजी झाली होती.दिल्ली येथे जन्मलेल्या अंजली गुप्ता यांनी दिल्ली विद्यापीठातून उच्च शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी भारतीय वायुदलात Short Service Commission अंतर्गत प्रवेश केला. त्यांची पहिली नियुक्ती कर्नाटकातील बेळगाव येथे झाली. पुढे त्या बंगळुरू येथील Aircraft Systems and Testing Establishment येथे कार्यरत होत्या.अंजली गुप्ता यांचे नाव राष्ट्रीय पातळीवर चर्चेत आले ते २००५ मध्ये. त्यांनी आपल्या काही वरिष्ठ अधिकाऱ्यांविरोधात गंभीर आरोप करत तक्रार दाखल केली. या प्रकरणानंतर भारतीय वायुदलात त्यांच्याविरोधात General Court Martial प्रक्रिया सुरू झाली. त्या भारतीय वायुदलातील पहिल्या महिला अधिकाऱ्यांपैकी नव्हे, तर पहिल्या महिला अधिकाऱ्यांपैकी एक ज्यांच्यावर कोर्ट मार्शलची कारवाई झाली, अशी नोंद विविध स्रोतांमध्ये आढळते.लष्करी न्यायप्रक्रियेनंतर त्यांना विविध आरोपांमध्ये दोषी ठरवण्यात आले आणि २००५-०६ दरम्यान त्यांची वायुदलातील सेवा संपुष्टात आली. उपलब्ध सेवाविषयक नोंदींमध्ये त्यांना ९ डिसेंबर २००५ रोजी सेवेतून बडतर्फ केल्याची नोंद आहे.या



संपूर्ण प्रकरणामुळे भारतीय संरक्षण व्यवस्थेतील शिस्त, लष्करी न्यायव्यवस्था, वरिष्ठ-कनिष्ठ संबंध आणि कार्यस्थळावरील तक्रारींची हाताळणी याबाबत सार्वजनिक चर्चा झाली. त्यांच्या आरोपांबाबत आणि कोर्ट मार्शलच्या निष्कर्षांबाबत त्या काळात माध्यमांमध्ये विविध मते मांडली गेली. त्यामुळे अंजली गुप्ता प्रकरणाकडे पाहताना आरोप, न्यायालयीन निष्कर्ष आणि त्यानंतरच्या घडामोडी यांच्यात फरक करणे महत्त्वाचे ठरते.११ सप्टेंबर २०११ रोजी भोपाळ येथे अंजली गुप्ता यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या आयुष्याशी संबंधित जुन्या वादांना पुन्हा उजाळा मिळाला आणि या प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीची मागणीही सार्वजनिक चर्चेत आली.अंजली गुप्ता यांच्या जीवनाकडे केवळ एका वादग्रस्त प्रकरणाच्या दृष्टिकोनातून पाहण्याऐवजी, भारतीय संरक्षण दलांमध्ये महिलांच्या वाढत्या सहभागाच्या सुरुवातीच्या काळातील आव्हाने, संस्थात्मक प्रक्रिया आणि कार्यस्थळावरील प्रश्न समजून घेण्यासाठी हे प्रकरण महत्त्वाचे ठरते. त्यांच्या कारकीर्दीने महिलांच्या संरक्षण क्षेत्रातील सहभागाबाबतच्या चर्चेला निश्चितच व्यापक व्यासपीठ मिळवून दिले.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९१६६०४
७६२०३८८२३०



श्री महाकालेश्वराचे अलौकिक दर्शन!
श्रावण मासानिमित्त भक्ती शक्ती मंदिरात, उज्जैनच्या श्री महाकालेश्वराचा प्रतिरूपाचे दर्शनाचा लाभ घ्यावा.
श्रावण मासारंभ निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
भक्ती शक्ती मंदिर
डेरे फाउंडेशन कॅम्पस, कऱ्हे फाटा, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर
।। ॐ नमः शिवाय ।। ।। श्री दत्तात्रेय नमः ।। ।। श्री विठ्ठल रुक्मिणी ।।

# 3 एकरांत ४० टन डाळिंबाचे उत्पादन; बांगलादेशासह परदेशात निर्यात

## ‘फ्रुट गार्ड’च्या वापरामुळे गुणवत्तेला मिळाली बाजारपेठ

## जवळे कडलग येथील अतुल देशमुख यांचा यशस्वी प्रयोग

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पारंपरिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिल्यास कमी क्षेत्रातही दर्जेदार उत्पादन घेऊन जागतिक बाजारपेठ गाठता येते, हे जवळे कडलग (ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) येथील डाळिंब उत्पादक शेतकरी अतुल देशमुख यांनी सिद्ध केले आहे. अवघ्या तीन एकर क्षेत्रात सुमारे १७०० डाळिंबाची झाडे जोपासत त्यांनी तब्बल ४० टन उत्पादन घेतले असून, त्यांच्या शेतातील डाळिंबाला बांगलादेशासह इतर देशांमध्ये निर्यातीची बाजारपेठ मिळाली आहे. विशेष म्हणजे, उत्पादनाला १२१ रुपयांपर्यंतचा भाव मिळाल्याने देशमुख यांच्या प्रयोगाची परिसरात चर्चा होत आहे.



डाळिंब उत्पादनामध्ये फळाची गुणवत्ता, आकर्षक रंग, आकार, वजन तसेच फळांचे बाह्य वातावरणापासून होणारे नुकसान यांना मोठे महत्त्व असते. अवकाळी पाऊस, ऊन, धूळ, कीड व इतर नैसर्गिक घटकांचा परिणाम फळांच्या गुणवत्तेवर होऊ शकतो. त्यामुळे केवळ झाडांची संख्या वाढविण्यापेक्षा प्रत्येक फळाची गुणवत्ता जपण्यावर भर देणे आवश्यक असल्याचे देशमुख यांच्या प्रयोगातून दिसून येते. अतुल देशमुख यांनी आपल्या तीन एकर क्षेत्रातील डाळिंब बागेत KR Innovationच्या Fruit Guard या प्री-हार्वेस्ट फ्रूट प्रोटेक्शन बॅगचा वापर केला. झाडावर फळांची वाढ होत असतानाच त्यांना संरक्षणात्मक कव्हर देण्यात आल्याने फळांना बाह्य वातावरणाच्या थेट परिणामापासून संरक्षण मिळण्यास मदत झाली. फळाच्या वाढीच्या कालावधीत योग्य संरक्षण मिळाल्यामुळे दर्जेदार फळे तयार करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना अधिक चांगली साथ मिळाली.

कमी क्षेत्रात अधिक उत्पादन घेणे हे आव्हान असते; मात्र उत्पादनाबरोबरच गुणवत्तेकडे लक्ष दिल्यास त्याचा बाजारपेठेवर सकारात्मक परिणाम होतो, असा अनुभव देशमुख यांनी व्यक्त केला. Fruit Guardचा वापर केल्यानंतर तयार झालेल्या डाळिंबाच्या गुणवत्तेबाबत त्यांना समाधान मिळाले. त्यातील निवडक दर्जेदार उत्पादनाला परदेशी बाजारपेठ मिळाल्याने या प्रयोगाला आणखी महत्त्व प्राप्त झाले.

देशमुख यांच्या शेतातील डाळिंब बांगलादेशासह इतर देशांमध्ये निर्यात झाले. स्थानिक बाजारपेठेपलीकडे आपल्या शेतातील उत्पादनाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळणे ही शेतकऱ्यासाठी अभिमानाची बाब आहे. गुणवत्तापूर्ण उत्पादनामुळे निर्यातीची संधी निर्माण होऊ शकते, याचे हे उदाहरण मानले जात आहे. डाळिंबाला मिळालेला १२१ रुपयांपर्यंतचा भाव हा या यशोगाथेतील महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. Fruit Guard च्या वापराबाबत बोलताना, फळाच्या वाढीच्या काळात त्याला संरक्षण देणे ही संकल्पना डाळिंबासारख्या उच्च-मूल्य असलेल्या फळपिकांसाठी महत्त्वाची ठरत असल्याचे दिसून येते. फळाभोवती संरक्षणात्मक आवरण तयार करून सूर्यप्रकाश, धूळ, प्रतिकूल हवामान आणि काही बाह्य घटकांचा थेट परिणाम कमी करण्यास या प्रकारच्या बॅगिंग तंत्रज्ञानाची मदत होते. त्याचबरोबर फळाच्या विकासासाठी अनुकूल सूक्ष्म वातावरण तयार होण्यासही मदत होऊ शकते.

KR Innovation ही JK Enterpriseser संबंधित उपक्रम असून, पॅकेजिंग सोल्युशन्स क्षेत्रातील ३२ वर्षांहून अधिक अनुभवाच्या आधारावर कंपनीने प्री-हार्वेस्ट फ्रूट प्रोटेक्शनच्या क्षेत्रात Fruit Guard विकसित केले आहे. आंबा, पेरू, सीताफळ, द्राक्षे आणि डाळिंब यांसारख्या विविध फळपिकांसाठी Fruit Guardचा वापर केला जातो. फळांचा आकार व वजन, एकसमान पक्वता, सनबर्नपासून संरक्षण तसेच कीड व प्रतिकूल हवामानाच्या परिणामांपासून संरक्षण मिळविण्याच्या दृष्टीने या तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. अतुल देशमुख यांच्या प्रयोगाची विशेष बाब म्हणजे अवघ्या तीन एकर क्षेत्रातून ४० टन उत्पादन आणि त्यातील गुणवत्तापूर्ण डाळिंबाला परदेशी बाजारपेठ मिळाली आहे. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर, उत्पादनाची गुणवत्ता आणि बाजारपेठेची गरज यांचा समन्वय साधल्यास डाळिंब शेती अधिक परिणामकारक आणि मूल्यवर्धित होऊ शकते, हे या यशोगाथेतून अधोरेखित झाले आहे.

कष्टाने केली आयुष्याला सुरुवात, केली सर्वांवर मायेची बरसात ।
ना ध्यानी ना मनी... तुम्ही गेलात आम्हाला सोडूनी ।
विसरता येत नाही तुमच्या आठवणी ।।
कै. कारभारी महादु कडलग
यांना प्रथम पुण्यस्मरणानिमित्त विनम्र अभिवादन !

समस्त कडलग परिवार, नातेवाईक व जवळे कडलग ग्रामस्थ
दैनिक युवातार्ता परिवार, संगमनेर

लासा जातीचा पाळीव कुत्रा हरवला आहे
HELP Find My Dog

संपर्क क्रमांक 9766033035
पत्ता : गंगा सूष्टी, ग्रेस हॉटेलसमोर, गुंजाळवाडी रोड, संगमनेर
कोकोला शोधून आणणाऱ्यास खास बक्षीस देण्यात येईल
संगमनेर शहरातील गंगा सृष्टी, ग्रेस हॉटेल, गुंजाळवाडी रोड परिसरातून लासा जातीचा पाळीव कुत्रा हरवला आहे. ‘कोको’ नावाचा हा कुत्रा हलक्या तपकिरी (Light Brown) रंगाचा असून त्याचे वय साडे दोन वर्षे आहे.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

# अहिल्यानगर जिल्ह्याच्या ग्रामीण राजकारणात बदल

## केंद्रप्रमुख, अंगणवाडी पर्यवेक्षिकांकडे आता गावचा कारभार

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अंगणवाडी पर्यवेक्षिका, केंद्रप्रमुख, कनिष्ठ अभियंता, विस्तार अधिकारी अशा जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांकडे आता गावचा कारभार आला आहे. याबाबतचे आदेश बुधवार (दि.९) रोजी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी काढले आहेत. राज्य सरकारने ज्या ग्रामपंचायतींची मुदत संपली आहे अशा ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त करण्याचे अधिकार शासनाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार भंडारी यांनी जिल्ह्यातील ७५४ ग्रामपंचायतींवर प्रशासकांची नेमणूक केली आहे.



त्यानुसार सहायक गट विकास अधिकारी, कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी, कक्ष अधिकारी, कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता, कार्यालयीन अधीक्षक, केंद्रप्रमुख, अंगणवाडी पर्यवेक्षिका, सहायक लेखाधिकारी आदी अधिकार्यांकडे प्रशासक म्हणून गावचा कारभार आला आहे. काही अधिकार्यांना दोन-दोन गावांची जबाबदारी देण्यात आली आहे. या कर्मचार्यांना गावचा कारभार कसा करावा, याबाबतचे प्रशिक्षण देऊन संबंधित ग्रामपंचायतीत रुजू केले जाणार आहे. मुदत संपलेल्या ७५४ ग्रामपंचायतींवर गेल्या सहा महिन्यांपासून विद्यमान सरपंचांकडेच प्रशासक म्हणून जबाबदारी होती. ही मुदत संपल्यानंतर शासनाने जिल्हा परिषद अधिकार्यांना प्रशासक म्हणून नेमण्याचे आदेश मंगळवारी काढले होते.या प्रशासकाची नियुक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा ग्रामपंचायतीची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत (यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत) वैध राहील. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९) मधील कलम १८२ व कलम १५१ नुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करून राज्य सरकारने हे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे दिले आहेत. आता प्रशासक नेमल्याने थांबलेला विकासाचा गाढा पुढे ढकलण्यास मदत होणार आहे.

**अकोले ५२, संगमनेर ९४, कोपरगाव २९, राहाता २५, श्रीरामपूर २७, राहुरी ४४, नेवासा ५९, पाथर्डी ७८, शेवगाव ४८, कर्जत ५६, जामखेड ४७, पारनेर ८८, श्रीगोंदा ५९: एकूण ७५४.**

दर्शन टेक्सटाईल मार्केट

तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करू नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
❋ कर्ज रक्कम वाढ । ❋ कर्ज व्याजदर कमी । ❋ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल

24 HRS EMERGENCY SERVICES
Health Emergencies Don't Wait. Neither DO WE
24 तास सुविधांसाठी
02425 - 224761
मोबा. 7038170382
डॉ. जठार हॉस्पिटल
ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25